(३ तास) एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) उजव्या बाजूकडील अंक गुण दर्शवितात.

१. (अ) वामनाचा रीतिविचार सविस्तर लिहा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) कुंतलाचा वक्रोक्तीविचार (२) क्षेमेंद्रांचा औचित्यविचार

२. (अ) ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत विशद करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) भरतभर्मींचे रससूत्र. (२) आनंदवर्धनाचा ध्वनीविचार

३. (अ) साहित्याच्या भाषेतील 'अभिधा' शब्दशक्तीचे कार्य तीच्या उपप्रकारासह स्पष्ट करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) मुक्तछंद (२) प्रतिमा व रुपक

४. (अ) भारतीय साहित्यशास्त्रातील 'प्रतिभा' या संकल्पनेचा आढावा घ्या. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) कोलरीजचा कल्पनाशक्तीचा सिद्धान्त (२) चमत्कृती शक्ती

५. (अ) भारतीय मीमांसक मम्मट याने सांगितलेली काव्याची प्रयोजने सांगा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) जीवनभाष्य-एक प्रयोजन
(२) आत्माविष्कार – एक साहित्याचे प्रयोजन

६. (अ) भट्टलोल्लट व श्रीशंकूक यांचा रसविषयक विचार लिहा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा

(१) आय.ए. रिचर्ड्सचा प्रेरणासंतुलनाचा सिद्धान्त.
(२) कॅथॉर्सिसची –संकल्पना

७. (अ) समीक्षा म्हणजे काय ते सांगून ' मूल्यमापन' या घटकाविषयी सविस्तर लिहा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा

(१) समीक्षेची कार्ये (२) समीक्षेतील विश्लेषण

८. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही १६) १६

(१) 'कला ही जीवनाची सर्जक अनुकृती आहे' हा सिद्धान्त कोणी मांडला ?

(२) 'नाट्यशास्त्र या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(३) 'काव्यशास्त्र' ग्रंथाचा कर्ता कोण ?

(४) कुंतलाने वक्रोक्तीचे किती प्रकार सांगितले आहेत ?

(५) 'विशिष्ट पदरचना रीति' असे रीतीचे स्वरूप कोणी सांगितले आहे ?

(६) 'संभावना विरह' ही संकल्पना कशाशी निगडीत आहे ?

(७) काव्यांगांना क्षेमेंद्र कोणती संज्ञा वापरतो ?

(८) कॅथॉर्सिसची संकल्पना कोणी मांडली ?

(९) 'ध्वनी' कल्पना कोणत्या शब्दशक्तीशी संबंधीत आहे ?

(१०) 'रमणियार्थ प्रतिपादकः शब्द' ही काव्याची व्याख्या कोणाची ?

(११) प्लेटोच्या ग्रंथाचे नाव लिहा ?

(१२) 'नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' असे प्रतिभेविषयी कोणी म्हटले आहे ?

(१३) विभावाचे दोन प्रकार कोणते ?

(१४) मम्मटाच्या साहित्यशास्त्रावरील ग्रंथाचे नांव काय ?

(१५) गुणांवर आधारित असलेल्या लक्षणेला काय म्हणतात ?

(१६) रीतिला दुसरे प्राचीन नाव काय ?

(१७) कोलरीज प्रतिभेचे कोणते दोन भाग मानतो ?

(१८) 'समीक्षा म्हणजे निर्णय' ही समीक्षेची व्याख्या कोणाची ?

(१९) कोणत्याही दोन स्थायी भावांची नांवे लिहा ?

(२०) समीक्षा व्यवहारातील सर्वात प्रथम टप्पा कोणता ?

------------------